# गोचीड नियंत्रणासाठी एकल आरोग्य दृष्टीकोन

## गोचीड नियंत्रण का आवश्यक आहे?

- गोचीड ॲनाप्लाज्मोसिस, थेलेरिओसिस आणि बेबेसिओसिस सारखे रोग पसरवतात, जे प्राणघातक असू शकतात
- जास्त प्रादुर्भावामुळे अशक्तपणा येतो, रोगप्रतिकारक शक्ती कमी होते आणि दूध उत्पादनात लक्षणीय घट होते
- गोचीड चाव्यामुळे होणारी ऍलर्जी गंभीर स्वरूपाची अस्वस्थता निर्माण करते
- प्रत्येक गोचीड मोठ्या संख्येने अंडी घालते (~३०००), ज्यामुळे एकदा स्थापित झाल्यानंतर त्यांचे नियंत्रण करणे कठीण होते.
- हे मानवांमध्ये देखील सांसर्गित होऊ शकतात ज्यामुळे क्रिमियन काँगो रक्तस्रावी ताप (CCHF) सारखे गंभीर गोचीड-जनित रोग संक्रमित करू शकतात.

## गुरांमध्ये गोचिडाचे जीवनचक्र आणि त्यांचे नियंत्रण बिंदू

हे लहान गोचीड प्राण्यांच्या शरीरावर चढतात आणि गोचिडा सारखे विकसित होतात.



**नियंत्रण बिंदू:**
- विशेषतः उबदार आणि दमट महिन्यांत जनावरांची मान, कासआणि पेरिनियमच्या भागांवर हात फिरवून नियमितपणे तपासणी करा



हे लहान गोचीड सुमारे ३ आठवडे रक्त पिऊन मोठे होतात आणि अंडी घालण्यासाठी खाली पडतात आणि नंतर मरतात

**नियंत्रण बिंदू:**
- देशी कोंबड्या पाळा ज्या गोचीड खातात
- जनावरांचे आणि परिसराचे नियमित गोचीड नियंत्रण करा
- नवीन खरेदी केलेल्या जनावराला कळपात आणण्यापूर्वी नेहमीच त्याचे गोचीड नियंत्रण करा
- प्रतिकार टाळण्यासाठी विविध ॲकेरिसाइड्स आणि ईव्हीएम यांचा आलटून पालटून वापर करा



एक पूर्ण वाढ झालेला गोचीड सुमारे ३००० अंडी घालू शकतो.

**नियंत्रण बिंदू:**
- जनावरांची आणि परिसराची नियमित गोचीड नियंत्रण करा.



अंडी उबल्यानंतर, अळ्या गवताच्या टोकांवर चढतात आणि एकत्र येतात

**नियंत्रण बिंदू:**
- जास्त प्रादुर्भाव असलेल्या कुरणांचा वापर टाळा.
- कुरणांचा आळीपाळीने वापर करा

## आर्थिक परिणाम

### गोचीड नियंत्रणाशिवाय
- वजन कमी होणे
- रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे
- लसीकरणातील अपयश
- गोचीड जनित रोगांमुळे (बेबेशिया, थेलेरिया, ॲनाप्लाझ्मा) मृत्युदर वाढण्याची शक्यता
- उत्पादनात घट
- उपचारांवर जास्त खर्च
- झुनोटिक रोगांचा धोका (उदा. CCHF)
- गोचिड चावल्यामुळे त्वचेची ॲलर्जी
- पशु कल्याणात घट
- जवळच्या पशुधन गोठ्यांमध्ये संसर्गाचा संभाव्य स्रोत

### गोचिड नियंत्रणासह
- गुरांच्या खाद्याचे चांगले रूपांतरण
- चांगली रोगप्रतिकारक शक्ती आणि कळपाचे आरोग्य
- गोचिड-जनित आजारांचा कमी धोका
- जास्त उत्पादन
- उपचारांवर कमी खर्च
- झुनोटिक संसर्गाचा धोका कमी
- चांगले पशु-कल्याण

**आजच गोचीड नियंत्रणाला सुरुवात करा!**

यू ट्यूब वर विडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा